आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२७ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जगभरातल्या पर्यटकांना भारताचं आकर्षण असल्यानं इथं बारमाही पर्यटन शक्य असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन /रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार जाहीर

- भारत आणि उझबेकिस्तान यांच्यात द्विपक्षीय गुंतवणूक करार

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं निधन

- मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांची महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक

**आणि**

- भारत-बांगलादेश कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे खंडित /बांगलादेशाच्या ३ बाद १०७ धावा

**<><><><><>**

भारत हे जगभरातल्या पर्यटकांसाठी आकर्षण असून इथे बारमाही पर्यटन शक्य असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. जागतिक पर्यटन दिनानिमित्त आज नवी दिल्ली इथं केंद्रीय पर्यटन मंत्रालयातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यटनाचा विकास अर्थव्यवस्थेच्या विकासाला मोठा हातभार लावतो असं सांगून ते म्हणाले की २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात पर्यटन उद्योगाची महत्त्वाची भूमिका असेल.

केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, पर्यटन राज्य मंत्री सुरेश गोपी आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. पर्यटन मंत्रालयातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट पर्यटन ग्राम पुरस्कारांच्या मानकऱ्यांची यादी यावेळी जाहीर करण्यात आली. त्यात कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला मिळाला आहे. या स्पर्धेत ३० राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधून एकूण ९९१ गावांनी भाग घेतला होता. साहस, कृषी,सामुदायिक जीवन, हस्तकला, वारसा, पर्यावरणाप्रति जबाबदारी, आध्यात्मिक आणि आरोग्य पर्यटन, तसंच विशेष लक्षवेधी आकर्षक पर्यटन अशा ८ विभागांमधे मिळून देशभरातल्या ३६ खेड्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नैसर्गिक साधन संपत्तीचा सुयोग्य वापर, सांस्कृतिक वारशाचं जतन, पारंपरिक मूल्यांचं जतन आणि शाश्वतता या निकषांवर ही निवड झाल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

जागतिक पर्यटन दिनाचं औचित्य साधून वेरुळ इथल्या राष्ट्रकूट पर्यटक निवासाचं उद्घाटन आज झालं. पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी मुंबईहून दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त आज पर्यटन विभागानं देशभरात विविध उपक्रम आयोजित केले होते. या दिनानिमित्त केंद्रसरकारने “पर्यटन मित्र” आणि “पर्यटन दीदी” हे दोन नवीन उपक्रम सुरु केले. या उपक्रमात पर्यटक स्नेही मार्गदर्शक तयार करण्यासाठी महिला आणि युवकांना प्रशिक्षण दिलं जाईल. प्रशिक्षणानंतर त्यांना आपल्या भागातल्या पर्यटनस्थळांवर हस्तकला आणि इतर उत्पादनं तयार करणे, खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणं, निसर्गसान्निध्यात भटकंती, वारसा स्थळांची सफर असे कार्यक्रम आयोजित करता येतील. प्रायोगिक तत्वावर आतापर्यंत देशभरात सुमारे तीन हजार जणांना प्रशिक्षण देण्यात आल्याचं पत्रकात म्हटलं आहे. मंत्रालयानं

इनक्रेडिबल इंडिया कंटेन्ट हबचं उद्घाटनही केलं.  देशभरातले विमानतळ आणि रेल्वे स्थानकांवर पर्यटकांना अभिप्राय नोंदवता येईल अशी सुविधा उपलब्ध करायचा मंत्रालयाचा विचार आहे.

<><><><><>

भारत आणि उझबेकिस्तान यांच्यात आज ताश्कंद इथं द्विपक्षीय गुंतवणूक करार करण्यात आला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि उझबेकिस्तानचे उपप्रधानमंत्री  खोडजायेव जमशीद अब्दुखाकिमोविच यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. भारतातल्या  उझबेकिस्तानी  गुंतवणूकदारांना आणि उझबेकिस्तानमधल्या भारतीय गुंतवणूकदारांना योग्य संरक्षणाची हमी या करारात दिली आहे. तसंच यात लवादाद्वारे विवाद मिटवण्यासाठी स्वतंत्र मंचाची तरतूदही  आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा साडेसहा ते सात टक्के दर भारत गाठू शकेल, असं अर्थ मंत्रालयानं ऑगस्टच्या मासिक वित्त आढाव्यात म्हटलं आहे. प्रमुख बिगर कृषी क्षेत्रांच्या वाढीचा दर पाच टक्के राहिल्यामुळे पहिल्या तिमाहीत आर्थिक विकासाचा वेग कायम राहिला होता, असं मंत्रालयानं काल प्रसिद्ध केलेल्या अहवालात नमूद केलं आहे. किरकोळ दरावर आधारित चलन फुगवट्याचा दर ऑगस्ट महिन्यात ३ पूर्णांक सात दशांश टक्के इतका मध्यम राहिल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत विविध बैठका घेतल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयोगाच्या पथकानं आज सकाळी राष्ट्रीय आणि

राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. नंतर राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी निवडणूक आयोगानं चर्चा केली.

त्यानंतर निवडणूक आयोगानं कोकण आणि पुण्याचे विभागीय आयुक्त, कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्यासोबत निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

<><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं आज पहाटे धुळे इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. उद्या त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

रोहिदास पाटील १९८० मध्ये तत्कालीन कुसुंबा आणि आताच्या धुळे ग्रामीण विधान सभा मतदारसंघातून निवडून आले आणि त्यानंतर सलग ६ वेळा त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. १९८६ ते १९८८ या कालावधीत ते महसूल राज्यमंत्री होते. त्यानंतर त्यांनी कृषी आणि फलोत्पादन मंत्री, ग्रामविकास, पाटबंधारे तसंच रोजगार हमी, गृहनिर्माण, संसदीय कार्य अशा विविध खात्यांचं मंत्रीपद भूषवलं.

रोहीदास पाटील यांच्या निधनाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जन खरगे, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, इत्यादी नेत्यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><>

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीनं महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या जोडीनं सु यिन हुई आणि वु लुओ या तैवानी जोडीचा २१-१२, २१-१७ असा सरळ गेममधे पराभव केला. या दोघी उद्या उपांत्य सामन्यात सिह पेई शान आणि हंग एन झु या दुसऱ्या एका तैवानी जोडीशी लढत देतील.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याचा खेळ आज पावसामुळं थांबवावा लागला. सकाळी कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर हा सामना सुरू झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. ३५ षटकात बांग्लादेशानं संघ ३ गडी बाद १०७ धावा केल्यानंतर खेळ थांबला. त्यानंतर पुन्हा खेळ सुरु होऊ शकला नाही.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. पर्यावरण रक्षणासाठीही हे अभियान उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. माथेरान या पर्यटनस्थळाच्या पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्नशील असलेले राकेश कोकळे म्हणतात…

**होल्ड --- बाईट...राकेश कोकळे (१६ सेकंद)**

**<><><><><>**

येत्या २९ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

पुणे मेट्रोच्या मार्गाचं लोकार्पण आणि भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे येत्या रविवारी २९ सप्टेंबर रोजी होणार आहे. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

आयुष मंत्रालय हे लोकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध असल्याचं आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. गेल्या १०० दिवसांच्या आयुष मंत्रालयाच्या कामगिरीविषयी ते नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते. आयुष मंत्रालयाच्या प्रणालीचं जागतिक आरोग्य सेवेत एकात्मीकरण करण्यासाठी मंत्रालय आणि जागतिक आरोग्य संघटनेने देणगीदार करारावर स्वाक्षरी केल्याची माहितीही जाधव यांनी दिली.

**<><><><><>**

संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भर्तृहरी महताब यांची  तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर यांची नेमणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री राधा मोहन सिंग हे संरक्षण विषयक,  तर राधा मोहन दास अग्रवाल  गृहविषयक समितीचे अध्यक्ष राहणार आहेत. सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, श्रीरंग बारणे यांची ऊर्जा विषयक समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे. याशिवाय इतरही अनेक समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक झाली आहे.

**//<><><><><>//**